

## Under Group Guidance Scheme Visit to Parents Village







PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Taluka Kankavli, Dist.Sindhudurg






IPAL
ARTS & CO... COLLE...
Phondaghat ... Dist. Sindhud...





ARTS & CO[illegible]ERCE COLLEGE
Phondaghat, Ta.Kankavli, Dist. Sindhudurg





ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli,Dist.Sindhudurg








ARTS ... COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli Dist.Sindhudurg



PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

**पुस्तक पेढी विभाग –**

१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी उपलब्ध आहे. यामध्ये क्रमिक पुस्तके समप्रमाणात वर्षभरासाठी दिली जातात. त्यासाठी जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत ग्रंथालयात जमा करावी.
२) सिद्धिविनायक पुस्तक पेढीमार्फत कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी संपूर्ण संच दिला जातो.
३) पुस्तक पेढीमार्फत घेतलेली क्रमिक पुस्तके वार्षिक परीक्षेच्या अगोदर चार दिवस जमा करावीत.

**वाचनालय विभाग –**

१) वाचनालय सकाळी ७.३० ते सायं. ६.०० पर्यंत उघडे राहील.
२) वाचन कक्षात ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही.
३) वाचन कक्षात पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, मासिके, दैनिके, नियतकालिके, शब्दसंग्रह, प्रश्नपत्रिका संच इत्यादी वाचनसाहित्य ओळखपत्रावर मिळेल.
४) वाचनालयात विद्यार्थ्याने शांतता पाळावी व ग्रंथालय नियमांचे पालन करावे.
५) वाचनालयातून ओळखपत्रावर घेतलेले वाचन साहित्य घरी जाण्यापूर्वी परत करावे.

**नियमावली –**

१) ग्रंथालयातून ग्रंथ घेताना ग्रंथ व त्यातील आतील पाने तपासून घ्यावीत.
२) ग्रंथाचे पाने फाडल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
३) ग्रंथ हरवल्यास किंवा अत्यंत खराब केल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल. अन्यथा अद्ययावत ग्रंथाच्या किमतीच्या दुप्पट रक्कम वसूल केली जाईल.
४) ग्रंथालयात असभ्य वर्तन करणे व शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सवलती बंद केल्या जातील.
५) ग्रंथालय तक्रारी संदर्भात ग्रंथपालाशी संपर्क साधावा.
६) ग्रंथालयामध्ये विविध नियतकालिके उपलब्ध असून स्पर्धा परीक्षेस उपयुक्त अशी अद्ययावत अशी पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्यादा दोन पुस्तके अभ्यासण्यासाठी दिली जातात. याव्यतिरिक्त आयकार्डवर एक पुस्तक दिले जाते. ग्रंथालयांमध्ये एकूण १० हजार ३२६ एवढी पुस्तके आहेत. सीडीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती पुरवली जाते.

**वैयक्तिक गट मार्गदर्शन योजना –** (Group Guidance scheme)

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व शैक्षणिक कार्यातील अडीअडचणी दूर करण्यासाठी वैयक्तिक गट मार्गदर्शन योजना काम करीत असते. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेताना मार्गदर्शन करणे, ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके इत्यादी संबंधी माहिती देणे, परीक्षा फॉर्म भरताना मार्गदर्शन करणे. गरीब होतकरू व नियमित विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी विद्यार्थी कल्याण विभागाकडे शिफारस करणे इत्यादी कामात मदत केली जाते.



PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Dist. Sindhudurg

Group Guidance scheme (GGS)



या योजनेचे कामकाज सुकर होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या गावानुसार गट तयार केले आहेत. विद्यार्थ्यांच्या अपेक्षित संख्येनुसार त्या-त्या गावाकरता एक किंवा दोन प्राध्यापकांवर त्यांच्या गावाचे गट मार्गदर्शक म्हणून जबाबदारी सोपवली आहे. या विभागांतर्गत कामकाज करीत असताना सदरचे गट मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या गावी जाऊन त्यांच्या घरी पालकांच्या भेटी घेतील. त्यांच्याशी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे उपस्थिती व शैक्षणिक उपक्रमातील सहभाग, अंतर्गत मूल्यमापन, परीक्षेतील उपस्थिती व प्रतिसाद, महाविद्यालयातील वर्तन व विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी विविध कोर्सेस इत्यादी गोष्टींवर चर्चा करतील. या सर्व कामांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या गट मार्गदर्शक प्राध्यापकांना पूर्ण सहकार्य करावयाचे आहे. महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील गावाचे गट व मार्गदर्शक प्राध्यापक यांची नावे पुढील तक्त्यात दिली आहेत.

| अ.नं | गावाचे नाव | गटमार्गदर्शक प्राध्यापक |
|---|---|---|
| १) | लोरे नं. १, २ ,आर्चिणे, गडमठ, खांबाळे | डॉ. सतीश कामत |
| २) | तोंडवली, पियाळी, वाघेरी, नांदगाव, तळेरे, बावशी | डॉ. संतोष रायबोले |
| ३) | हरकुळ, मोहूळ, करंजे, कनेडी | डॉ. राजाराम पाटील |
| ४) | फोंडाघाट परिसरातील सर्व वाड्या | प्रा. संतोष आखाडे व प्रा. जगदिश राणे |
| ५) | करूळ, कोंडये, डामरे, तिवरे | डॉ. बालाजी सुरवसे |
| ६) | घोणसरी, कुर्ली | प्रा. विनोदसिंह पाटील |
| ७) | फोंडाघाट बाजारपेठ | डॉ. सौ. विद्या मोदी |
| ८) | येथे नमूद केलल्या गावांव्यतिरिक्तची सर्व गावे | लेफ्ट. डॉ. राज ताडेराव |

**विद्यार्थी कल्याण विभाग –**

प्रत्येक विद्यार्थी हा महाविद्यालयाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे त्याचे जीवन सुंदर व सुखकारक होण्यासाठी महाविद्यालयास जे जे करता येणे शक्य आहे ते निश्चितपणे केले जाते. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी शासन, विद्यापीठ व विविध संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सवलती व शिष्यवृत्या विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी हा विभाग प्रयत्न करतो.



PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli Dist. Sindhudurg